International Journal of Applied Research 2016; 2(4):602-604



International Journal of Applied Research

**ISSN Print:** 2394-7500
**ISSN Online:** 2394-5869
**Impact Factor:** 5.2
IJAR 2016; 2(4): 602-604
www.allresearchjournal.com
Received: 02-02-2016
Accepted: 03-03-2016

**बाबासाहेब त्रिंबक मोताळे**
राज्यशास्त्र विभाग, स्व.अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे (महाराष्ट्र) ४२४३०२.

**Correspondence**
**बाबासाहेब त्रिंबक मोताळे**
राज्यशास्त्र विभाग, स्व.अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे (महाराष्ट्र) ४२४३०२. भ्रमणध्वनी

# आधुनिक भारताच्या निर्मितीमधील पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे योगदान

**बाबासाहेब त्रिंबक मोताळे**

**सारांश (Abstract)**
भारतात स्वातंत्र्योत्तर काळात दारिद्रय, निरक्षरता, अन्नधान्याची टंचाई, प्रचंड सामाजिक व आर्थिक विषमता असतांनादेखील भारताला नवसमाज निर्मितीचे स्वप्न देणारे आणि प्रत्यक्षात नवसमाज निर्मितीच्यादृष्टिने कृतीशील प्रयत्न करणारे नेतृत्व म्हणून भारताचे प्रथम पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी स्वतंत्र भारताला दुरदृष्टिकोणातून नवी दिशा प्राप्त करून दिली. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समाजवाद, सहिष्णूता इ. मुल्यांना भारतीय समाजव्यवस्थेत रूजवण्याचे कठिण कार्य त्यांनी केले. अलिप्ततावाद आणि पंचशील तत्वांचा स्विकार करून त्यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाला निश्चित आकार प्राप्त करुन दिला. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणातदेखील भारताचे स्वतंत्र व्यक्तिमत्व सिध्द केले. त्यांनी नियोजन आयोग आणि पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून भारताच्या नियाोजनबध्द आर्थिक विकासाला दिशा व गती प्राप्त करून दिली. नवस्वतंत्र भारताला ज्या प्रकारच्या ध्येयधोरणांची व नेतृत्वाची गरज होती, ती गरज लक्षात घेऊन संबंधित धोरणाचा स्विकार पंडीतजींनी केला. पंडीत नेहरू यांच्या आधुनिक विचारांचा, त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा, नेतृत्व व कर्तृत्वाचा भारताच्या जडणघडणीत निश्चितच सिंहाचा वाटा आहे. पंतप्रधानपदी असतांना आधुनिक भारताच्या राजकारणारवर सर्वाधिक छाप पाडुन भारताला योग्य दिशा देण्याचे कार्य पंडीतजींनी केले. प्रस्तुत संशोधन लेखात आधुनिक भारताच्या निर्मितीमधील पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या योगदानाची नवनवीन संदर्भाच्या आधारे मांडणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**Keywords: निर्मितीमधील, यांचे योगदान, यांचे योगदान**

➢ **संशोधनाचा उद्देश (Objectives of research):**

01) पंडीत नेहरू यांच्या परराष्ट्रीय धोरणाचा आढावा घेणे.
02) आधुनिक भारताच्या निर्मितीमधील पंडीत नेहरूंच्या योगदानावर प्रकाश टाकणे.
03) आधुनिक भारताच्या निर्मितीमधील पंडीत नेहरूंच्या दुरदृष्टिकोणाचा आढावा घेणे.
04) भारताच्या आर्थिक नियोजन व विकासातील नेहरूंची भूमिका तपासणे.

➢ **संशोधन पध्दती (Research Methodology):**

प्रस्तुत विषयावर संशोधन करतांना ऐतिहासिक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतींचा आढावा घेण्यात आला.

➢ **आधुनिक भारताच्या निर्मितीमधील पंडीत नेहरूंचे योगदान (Contribution of Pandit Nehru in modern India):**

**नवस्वतंत्र भारतासमोर फाळणी, कर्जाचा डोंगर, सततचा दुष्काळ व अन्नधान्याची टंचाई, संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न, दारिद्रय, निरक्षरता, सामाजिक व आर्थिक विषमता इ. विविध समस्यांचा डोंगर उभा असतांना स्वतंत्र भारताचे प्रथम पंतप्रधान पंडीत नेहरू यांनी खंबीरपणे भारताचे नेतृत्व केले. अविकसीत भारताला आधुनिक जगाच्या प्रवाहात आणण्याचे मौलिक कार्य पंडीतजींनी केले. विविध बाबी त्यांच्या कारकिर्दिच्या यशस्वीतेची उदाहरणं म्हणून सांगता येतील.**

**1) पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी**

**पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतर पंडीत नेहरूंनी सोव्हिएत रशिया या राष्ट्राने आर्थिक नियोजनाच्या माध्यमातुन अल्पावधित केलेल्या विकासाचा अभ्यास करून भारताच्या विकासासाठी आर्थिक नियोजन करण्याचा निर्णय घेतला. "1950 मध्ये भारतात नियोजनातुन विकास करण्यासाठी नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली. नेहरू हे नियोजन आयोगाचे प्रथम अध्यक्ष होते."[01] भारताच्या सामाजिक व आर्थिक विकास करण्यासाठी दुरदृष्टिकोणातून पंडीतजींनी सोव्हिएत रशियाच्या धर्तीवर नियोजन आयोगाच्या माध्यमातून पंचवार्षिक योजनांचे नियोजन केले. कारण**

भारतातील उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करण्यासाठी नियोजन अत्यावश्यक आहे, हे त्यांनी ओळखलेले होते. थोडक्यात पंडीत नेहरूंनी आर्थिक नियोजनाच्या युगाची सुरूवात करून भारतात नियोजनातून विकास प्रक्रियेला प्रारंभ केला. 1950 मध्ये स्थापन करण्यात आलेल्या नियोजन आयोगाने देशाचा नियोजनबध्द आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी

"i) डरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी उत्पादनात वाढ करणे.
ii) सर्वांना रोजगार उपलब्ध करून देणे.
iii) संपत्ती व उत्पन्न यांतील विषमता नष्ट करणे.
iv) संपत्ती व न्यायावर आधारित समाजवादी समाजाची उभारणी करणे व शोषणरहित समाजव्यवस्था निर्माण करणे."[02] ही चार उद्दिष्टये डोळयांसमोर ठेवली. पंडीत नेहरूंच्या पंतप्रधान पदाच्या कार्यकाळात प्रथम व व्दितीय पंचवार्षिक योजना अनुक्रमे 1951 ते 1956, 1956 ते 1961 या कार्यकाळात राबविण्यात आली. तसेच तिसरी पंचवार्षिक योजना 1991 ते 1966 याकाळात राबविण्यात येत असतांनाच दुर्देवाने पंडीतजींचे निधन झाले. पंचवार्षिक योजनांमुळे भारताच्या परकिय चलनात वाढ झाली, पर्यायाने भारताची अर्थव्यवस्था सावरण्यास चांगलीच मदत झाली. मात्र असे असले तरीदेखील सरकारी नोकरांची काम करण्यातील कुचराई, अवर्षन, युध्दखर्चातील वाढ, भाववाढ, इ. विविध कारणांमुळे आर्थिक विकासाच्या नियोजनात अडथळे निर्माण झाले. थोडक्यात पंडीत नेहरूंनी भारताच्या आर्थिक विकासासोबत सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले.
"ग्रामीण जीवनाचा सर्वांगीण विकास घडवून आणणे, तेथील जनतेच्या दृष्टिकोणात बदल निर्माण करणे."[03] हे 1952 मध्ये पंडीत नेहरूंनी सुरू केलेल्या 'समुह विकास योजनेचे' उद्दीष्ट होते. थोडक्यात ग्रामीण भारताचा विकास साध्य करण्यासाठी नेहरूंनी सूरू केलेली घ्बहुउद्देशीय योजनाङ म्हणजे घ्समुह विकास योजनाङ होय. या योजनेव्दारे ग्रामीण जनतेला स्वावलंबी करण्याचा प्रयत्न पंडीतजींनी केला.

2) **मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार**

पंडीत नेहरूंनी "भारतासाठी संमिश्र अर्थव्यवस्था स्विकारण्यासाठी भांडवलशाही तसेच साम्यवादी अर्थव्यवस्थेतील दोष नाहीसे करणे, व्यक्तिगत, सामाजिक तसेच राजकीय स्वातंत्र्याबरोबर आर्थिक स्वातंत्र्य देणे, कल्याणकारी राज्याची स्थापना करणे, जीवनावश्यक वस्तुंचे वाटप करणे, आवश्यक उत्पादनांची साधने शासनाच्या नियंत्रणाखाली आणुन महत्वाच्या उद्योगधंद्दयांचे राष्ट्रीयीकरण करणे"[04] ही उद्दिष्टये निश्चित केलेली होती. थोडक्यात भारताचा आर्थिक विकास वेगाने व्हावा, परंतु त्याचबरोबर समाजातील विषमताही कमी व्हावी या दुरदृष्टिकोणातुन पंडीत नेहरूंनी भारतासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा मध्यम मार्ग स्विकारला. पंडीत नेहरूंच्या मते" देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्था आवश्यक आहे."[05] भारताच्या विकासासाठी पूर्णपणे भांडवलशाही अर्थव्यवस्था किंवा समाजवादी अर्थव्यवस्था अनुकूल नसून मिश्र अर्थव्यवस्थाच अनुकुल असल्याचे स्पष्ट करून पंडीतजींनी या अर्थव्यवस्थेचा भारताच्या विकासासाठी स्विकार केला.

3) **स्वतंत्र परराष्ट्रधोरणाची निर्मिती**

पंडीत नेहरूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे परराष्ट्र धोरण निश्चित करत असतांना पुढील मुलभूत तत्वांवर भर दिला;

1. सर्व राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे.
2. संयुक्त राष्ट्राच्या सर्व कार्यात सक्रिय सहभाग घेणे व सहकार्य करणे.
3. शांतता स्थापना करण्यासाठी पश्चिमी राष्ट्रांचा गट आणि साम्यवादी राष्ट्रांच्या गटांच्या मध्ये समन्वय निर्माण करणे.
4. पारतंत्र्यात असणाऱ्या राष्ट्रांच्या स्वतंत्र्यासंबंधी चालवल्या जाणाऱ्या संघर्षाचे समर्थन करणे.
5. जातीय भेदभाव, रंगभेद यांचा विरोध करणे.
6. राष्ट्रीय हिताचे सरंक्षण करणे.
7. साम्राज्यवाद व वसाहतवादास भारताचा विरोध असेल.
8. भारत कोणत्याही लष्करी गटात सामील होणार नाही.
9. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेच्या दृष्टीने भारताचे परराष्ट्र धोरण असेल."[06] पंडीत नेहरुंनी या तत्वांच्या आधारे स्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणाची आखणी करून भारताच्या परराष्ट्र धोरणाला निश्चित दिशा दिली.

'अलिप्तवाद' हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा मुख्य आधारस्तंभ बनला. अलिप्तवादाचा स्विकार करण्यामागील भूमिका स्पष्ट करतांना पंडीत नेहरू म्हणतात की," शांततारक्षण हा भारताच्या धोरणाचा मध्यवर्ती उद्देश आहे. याच उद्देशाला अनुसरून आम्ही अलिप्ततेचा मार्ग स्विकारलेला आहे. अलिप्तता याचा अर्थ क्रियाशुन्यता नव्हें, किंवा अनिष्ट गोष्टीसुध्दा निमुटपणे मान्य करणे, असा नव्हे. आपल्यासमोरील प्रश्नांबाबत होकारात्मक आणि कृतीशील असा तो दृष्टिकोण आहे. आमचा असा विश्वास आहे की, प्रत्येक देशाला स्वातंत्र्याचा हक्क आहे. त्याचप्रमाणे स्वत:चे धोरण आणि जीवनपध्दती स्विकारण्याचाही अधिकार आहे. म्हणूनच दुसऱ्या देशाच्या अंतर्गत बाबतील हस्तक्षेप न करणे आणि अतिक्रमण न करणे यावर आमचा विश्वास आहे."[07] व्दितीय महायुध्दानंतर भांडवलशाहीवादी अमेरीका व साम्यवादी सोव्हिएत रशिया या दोन राष्ट्रांच्या नेतृत्वाखाली जागतिक राजकारणाचे व्दिध्रुवीकरण झालेले असतांना पंडीत नेहरूंनी इजिप्त व इंडोनेशिया या राष्ट्रांच्या सहकार्याने जगातील नवस्वतंत्र राष्ट्रांसमोर तिसरा पर्याय उपलब्ध करून दिला. प्रत्येक राष्ट्राचे जागतिक राजकारणातील स्वतंत्र व्यक्तिमत्व टिकवून ठेवण्याचे त्यांचे हे धोरण तत्कालिन काळात स्वागतार्ह होते. आंतरराष्ट्रीय राजकारणात नेहरूंनी स्विकारलेले अलिप्ततेचे धोरण भारताच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य सुत्र बनले. केवळ भारताच्याच परराष्ट्र धोरणाचे हे मुख्य सुत्र ठरले नाही तर अलिप्तता ही एक जागतिक चळवळ (NAM- Non Alignment Movement) बनली, यामध्ये निश्चितच नेहरूंचे योगदान महत्वपूर्ण ठरले.
जागतिक शांतता प्रस्थपित करणाच्यादृष्टीने 1954 मध्ये पंडीत नेहरू आणि चीनचे पंतप्रधान चौ-एन-लाय यांच्यात जो करार झाला, त्या करारानुसार स्विकारण्यात आलेली पाच तत्वे 'पंचशील तत्वे' ( Five Rules of Conduct) म्हणुन प्रसिध्द आहेत, ती पुढीलप्रमाणे ;

1. परस्परांच्या प्रादेशिक एकात्मतेबद्दल आणि सार्वभौमत्वाबद्दल आदर बाळगणे.
2. परस्परांच्या प्रदेशावर आक्रमण न करणे.
3. परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.
4. सर्व राष्ट्रे समान मानुन परस्परांच्या हिताचे कार्य करणे.
5. शांततामय सहजीवन (Peaceful Co-existence) आणि आर्थिक सहकार्याचा पुरस्कार करणे."[08] आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांनी परस्परांशी कसा व्यवहार करावा, यासंबंधी ही तत्वे आदर्शवत आहेत. पंचशील तत्वे म्हणजे पंडीत नेहरूंनी भारताच्या परराष्ट्र धोरणाला दिलेली देणगी आहे.अशाप्रकारे घ्अलिप्ततावादङ आणि घ्पंचशील तत्वांचाङ स्विकार करून पंडीत नेहरूंनी भारताच्या परराष्ट्रधोरणाला विशिष्ट आकार व दिशा दिली. नेहरूंच्या या योगदानामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची विशिष्ट ओळख निर्माण झाली.

**4) नि:शस्त्रीकरण व अण्वस्त्र धोरण**

जागतिक शांतता व नि:शस्त्रीकरणाबाबत पंडीत नेहरू म्हणतात की, "युध्दातुन, युध्दसज्जतेतून वा युध्दाच्या भीतीतून शांतता कधीच उदयास येऊ शकत नाही."[09] यावरुन स्पष्ट होते की, पंडीत नेहरूंनी जागतिक शांतता व नि:शस्त्रीकरणाचा पुरस्कार केला होता. यासंदर्भात पंडीत नेहरू म्हणतात की," जर आम्हाला शांतता पाहिजे असेल, तर आम्हाला परस्परांविषयीचा अविश्वास आणि परस्पराविषयी वाटणारी भीती दूर करावयास पाहीजे. सहिष्णू आणि सहकार्याची भावना बाळगावी लागेल. तसेच मानवजातीच्या हितासाठी, विनाशकारी शस्त्रांना नष्ट करावे लागेल."[10] मानवतावादी दृष्टिकोणातुन पंडीत नेहरूंनी नि:शस्त्रीकरणाचा स्विकार केला.
पंडीत नेहरूंनी 06 एप्रिल 1948 रोजी संसदेत अणूऊर्जा विधेयक सादर करून भारताच्या आण्विक कार्यक्रमाला अंतिम स्वरूप दिले. दि.10 आक्टोंबर 1948 ला होमी भाभांच्या अध्यक्षतेखाली अणुऊर्जा आयोगाची स्थापना करण्यात आली."[11] पंडीत नेहरूंनी दुरदृष्टिकोणातून अणूऊर्जेचे महत्व ओळखलेले होते, कारण देशाच्या औद्योगिकरणात अणुऊर्जा निश्चितच उपयुक्त ठरेल, असा त्यांना विश्वास होता. म्हणुनच त्यांनी अणुऊर्जा आयोगाची स्थापना केली. पंडीत नेहरूंचे आण्विक धोरण"
(i) अणुविज्ञानाचा शांततामय कार्यासाठी वापर करण्यासाठी संशोधन आणि अणु कार्यक्रमाबाबत स्वावलंबनासाठी प्रयत्न करणे.
(ii) अणुबॉम्ब निर्माण न करायचा निर्धार आणि जागतिक नि:शस्त्रीकरणाला संपूर्ण पाठिंबा देणे."[12] या दोन वर्षांवर आधारित होते. अणुशक्तीचा वापर विध्वंसासाठी न करता शांतता व देशाच्या विकासासाठी करण्याचा निर्धार पंडीतजींनी केला होता.

शस्त्रास्त्र निर्मिती व खरेदीवर अधिक खर्च न करता देशाच्या विकासावर अधिक खर्च करण्याचा त्यांचा नेहमी प्रयत्न होता.

**5) भाषावार प्रांतरचना:**

"प्रारंभी पंडीत नेहरूंचा देशाच्या भाषावार पुनर्रचनेला विरोध होता. परंतु आंध्र व महाराष्ट्रातील लोकमताची प्रखरता लक्षात घेऊन त्यांनी भाषावार राज्यपुनर्रचना घडवून आणली."[13] स्वतंत्र भारतासमोर भाषावार प्रांतरचनेपेक्षा इतर काही महत्वांच्या समस्यांवर नेहरूंनी आपले लक्ष केंद्रीत केल्यामुळे प्रारंभी त्यांनी भाषावार प्रांतरचनेला अधिक महत्व दिलेले नव्हते. परंतु नंतरच्या काळात मात्र त्यांनी देशात भाषावार प्रांतरचना घडवून आणली. भाषावार प्रांतरचनेमुळे एकभाषिक सलग प्रदेश निर्माण झाला, पर्यायाने यातुन देशाची राष्ट्रीय एकात्मता अधिक प्रबळ झाली.

"समाजवादी धर्तीचे लोककल्याणकारी राज्य निर्माण व्हावे, अशी नेहरूंची इच्छा होती व त्यांनी हया दिशेने 1948 साली 'आराम हराम है' हा संदेश सर्व देशाला दिला. सर्वसाधारण माणूस सुखी झाला पाहिजे, ही त्यांची इच्छा होती."[14] भारतात लोककल्याणकारी राज्याजी स्थापना करण्यासाठी पंडीत नेहरूंनी सतत प्रयत्न करून भारतीय जनतेला 'आराम हराम है' हा अर्थपूर्ण संदेश दिला आणि आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये महत्वपूर्ण योगदान दिले.

भारतासारख्या नवस्वतंत्र व विकसनशील राष्ट्राला वैभव प्राप्त करून देण्यासाठी जवळपास 17 वर्षाच्या पंतप्रधान पदाच्या कार्यकाळात पंडीत नेहरुंनी अतुलनीय योगदान दिले. भारतीय संविधानाची निर्मिती, परराष्ट्र धोरणाची निर्मिती, पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी, मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार, ग्रामविकास, आण्विक धोरण, कृषी विकास, आरोग्य सुविधा, विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास इ. विविध क्षेत्रात भारताला सक्षम बनवण्यात पंडीतजींची भूमिका महत्वपुर्ण ठरली. म्हणुनच आधुनिक काळातदेखील भारताच्या परराष्ट्रधोरणावर, अर्थकारणावर, राजकारणावर व समाजकारणावर पंडीतजींच्या विचार, कर्तृत्व व नेतृत्वाचा ठसा उमटलेला स्पष्टपणे दिसुन येतो.

## ➢ निष्कर्ष (Conclusion)

1. आधुनिक भारताच्या नियोजनामध्ये पंडीत नेहरूंचे योगदान महत्वपुर्ण आहे.
2. पंडीत नेहरू 'भारतीय नियोजनाचे जनक' आहेत.
3. पंडीत नेहरूंनी नियोजन आयोग व पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातुन भारताचा विकास घडवून आणला. परंतु याबाबतीत त्यांना संमिश्र यश झाले.
4. आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी पंडीत नेहरूंनी मिश्र अर्थव्यस्थेचा स्विकार केला.
5. पंडीत नेहरूंनी अलिप्ततावाद, पंचशील तत्व आणि जागतिक शांततेचा पुरस्कार करून भारताच्या परराष्ट्र धोरणाला निश्चित आकार व दिशा दिली.
6. पंडीत नेहरूंनी आण्विक उर्जेचा उपयोग देशाच्या औद्योगिक विकासासाठी केला.
7. भारतातील भाषावार प्रांतरचनेत पंडीत नेहरूंची भूमिका महत्वपुर्ण ठरली.
8. पंडीत नेहरुंनी शस्त्रास्त्रस्पर्धा, लष्करी गटबाजीला विरोध करुन भारताच्या विकासाचा मार्ग सुकर केला.
9. पंडीत नेहरुंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर एक बलशाली व आधुनिक राष्ट्र म्हणून भारताचा स्थिर व संस्थात्मक पाया मजबूत केला.

## संदर्भसुची (References):


1. पाटील डॉ. वा. भा., आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन, 2009, पृष्ठ क्र.-186.
2. जावळे प्रा. अमर वसंत, काटे पाटील प्रा. भुषण ज्ञानदेव (संपा.), लोकसेवक, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन, 2012, पृष्ठ क्र.-170.
3. पाटील डॉ. वा. भा., भारतीय राजकीय विचारवंत, नागपूर, श्री. मंगेश प्रकाशन, 1998, पृष्ठ क्र.-176.
4. देवरे प्राचार्य डॉ. पी. डी., विसपूते, प्रा. डॉ. एस. एम., आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, पुणे, प्रशांत पब्लिकेशन, 2004, पृष्ठ क्र.-108.
5. पाटील डॉ. वा. भा., आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन, 2009, पृष्ठ क्र.-187.
6. उपरोक्त 02, पृष्ठ क्र.-209.
7. उपरोक्त 03, पृष्ठ क्र.-167.
8. नांदेडकर प्रा. डॉ. व. गो., राजकीय विचार आणि विचारवंत, पुणे, डायमंड पब्लिकेशन, 2011, पृष्ठ क्र. -311.
9. भोळे डॉ. भास्कर लक्ष्मण, आधुनिक भारतातील राजकीय विचार, नागपूर, पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स, 2003, पृष्ठ क्र.-760.
10. उपरोक्त.03, पृष्ठ क्र.-169.
11. Lok Sabha Debets, Second Session, Vol.15, April-2006.
12. दैनिक सकाळ, दि.19 एप्रिल 1987, परांजपे डॉ. श्रीकांत यांच्या 'भारताचे आण्विक
13. धोरण' या लेखातुन.
14. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोष- खंड- ८, मुंबई, महाराष्ट्र राज्य
15. साहित्य आणि संस्कृती मंडळ, 1979, पृष्ठ क्र.-950.
16. कल्याणकर बा.ह.(संपा.), पंडीत जवाहरलाल नेहरू-व्यक्ती आणि कार्य, मुंबई, महाराष्ट्र
17. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, 2002, पृष्ठ क्र.-25.